# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट ३२८ - २३** **दिनांक : - २१/०९/२०२३**

## पितळी नळ चोरी करणारा आरोपी अटक

## नवघर पोलीस ठाणे - गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगीरी

नवघर पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात फिर्यादी मोहम्मद फारुख जलील अहमद राईन वय-६२ वर्षे, धंदा- व्यवसाय रा.रुम.नंबर.ए-०३ आझाद नगर, गल्ली नंबर.०३ गाळा नंबर.२२/२३ फाटक रोड, काशिमीरा रोड, शानदार मार्बल समोर, भाईंदर पुर्व यांनी त्यांचे मदरसा अंजुमन गरीब, नवाज नुरी मस्जिद, आझाद नगर, गोल्डन नेस्ट, पोलीस चौकीच्या मागे, भाईंदर पुर्व येथील वजु खाण्यातील हात-पाय धुण्यासाठी लावण्यात आलेले २१ नग पितळी नळ कोणीतरी अज्ञात चोरट्याने स्वताचे फायद्याकरीता लबाडीच्या इराद्याने चोरी करुन चोरुन नेलेबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ५८४/२०२३ भा.दं.वि.सं.कलम-३८० प्रमाणे दि.१७/०९/२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आलेला होता.

सदरचा गुन्हा हा मस्जीदमध्ये चोरीचा गंभीर स्वरुपाचा असल्याचे लक्षात घेवुन त्याबाबत मा.वरिष्ठांचे दिलेल्या सुचनांप्रामणे तपास करुन तपासादरम्यान गुन्हयाच्या घटनास्थळावरील तसेच घटनास्थळाच्या आजुबाजुचे सीसीटीव्ही कॅमेरांचे फुटेज प्राप्त करुन त्याअनुशंगाने पोलीस ठाण्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता सदरचा गुन्हा हा आरोपी नामे दिपेश सुरेश परमार, वय-२५ वर्षे, व्यवसाय-गॅरेज चालवणे रा. बी/१०७, संगम अपार्टमेंट, शिवसेना गल्ली, भाईंदर-पश्चिम, ता.जि.ठाणे याने केला असल्याचे निष्पन्न झाले होते. त्यानंतर सदर आरोपी यांचा बातमीदारामार्फत तसेच तांत्रिक तपास केला असता तपासादरम्यान सदर आरोपी यास राईगाव, उत्तन रोड, भाईंदर पश्चिम येथुन ताब्यात घेवुन त्याचाकडे तपास केला असता त्याचा सदर गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास नमुद गुन्हयात दि.२०/०९/२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी श्री.जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, श्री. उमेश माने-पाटील, सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग,यांचे मार्गदर्शनाखाली विजय पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, पो.नि.सुशिलकुमार शिंदे (गुन्हे), स.पो.नि.संदिप पालवे, पो.उप.निरी. ज्ञानेश्वर आसबे, पो.हवा. संतोष पाटील, भुषण पाटील, सुरेश चव्हाण, नवनाथ घुगे, जयप्रकाश जाधव, पो.अं. ओंकार यादव, सुरजसिंग घुनावत, विनोद जाधव यांनी केलेली आहे.

**----0000----**